# (कै.) भाऊसाहेब गांधी जन्मदिनी पाचशे जणांचे रक्तदान

**सोलापूर, ता. २० :** (कै.) भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर झाले. यात पाचशे दात्यांनी रक्तदान केले.

जन्मदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध उपक्रम झाले. सोलापूर विद्यापीठाचे 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. बी. एन. कांबळे यांच्या हस्ते (कै.) भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, खजिनदार भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. शशिकांत हल्कुडे, प्रा. महेश महंत, प्रा. दिलीप दोशी, डॉ. सुलभा आपटे, प्रा. एस. एस. पाटील, डॉ. सचिन गेंगजे, डॉ. शंतनू दीक्षित, प्रा. लुईस लोबो यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड बँक, डॉ. हेडगेवार रक्तपेढी आणि अश्विनी रूरल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर आदी रक्तपेढ्या या शिबिरात सहभागी झाल्या. रचित शहा यांनी सूत्रसंचालन केले. प्रतीक्षा जाजू यांनी आभार मानले.